# हो धनु भाऊ ही चूक आम्ही केली,पुढे पण करणारच-खुर्शीद

## ज्यांना आमदारकीचे गाजर दाखवलं ते ऐकतील तुमचं, पण..जिल्ह्याचा बहाद्दर मुस्लिम समाज भाजपाच्या मांडीला मांडी लावून मतांची भीक घालणार नाही!

बीड (सरकार): काल झालेल्या भाजप प्रणित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या अल्पसंख्यांक मेळाव्यात आपण अल्पसंख्यांक समाजाला उद्देशून खास करून मुस्लिम समाजाला सांगितलं की आम्ही लोकसभेला चूक केली पंकजा ताई ला मतदान केले नाही .. हो नाही केलं आणि कदापि करणार नाही आणि ही चूक आम्ही आणि बीड जिल्ह्याचा नव्हे तर अख्ख्या भारताचा इमानदार बहाद्दर आणि गैय्युर मुस्लिम समाज एक वेळा नाही तर शंभर वेळा ही चूक करणार,



कारण आमचं ताईशी काही वैर नाही पण ताई ज्यापक्षाकडून निवडणूक लढवीत होत्या त्या भाजपा पक्षाशी आमचं राजकीय वैर आहे, कारण सांगायची गरज नाही मुस्लिम समाज काय अख्ख्या भारताला माहीत आहे की भाजप जी काय पॉलिसी आहे, आज पर्यंत आम्ही गुजरात ची दंगल विसरू शकलो नाही, मुस्लिम समाजाचा घरं जाळण्यात आली, आमच्या आई बहिणीवर बलात्कार करून त्यांना जिवंत जाळण्यात आले. गर्भवती आई च्या पोट चिरून त्याचं अर्भक तलवारीवर नाच्वण्यात आलं, बिल्कीस बानू बलात्कार प्रकरणात दोषींना सोडुन त्या पापी लोकांचा मुस्लिम समाजाच्या नाकावर टिच्चून जागोजागी सत्कार करण्यात आलं हार तुरे देऊन गौरवण्यात आले,गौरक्षकच्या नावाखाली हजारो तरुणाची हत्या करण्यात आली, ही गोष्ट मुस्लिम समाज कदापि विसरणार नाही,आमच्या धार्मिक विषयात लुळबुळ करण्यात येत आहे तीन तलाक असो, समान नागरिक कायदा (CAA,NRC) असो वक्फ बोर्ड असो,

आणि आमच्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहू अलाईहोसल्लम बद्दल गरळ ओकनाऱ्या रामगिरी महाराज ला तुमचा मुख्यमंत्री स्टेज वर जाऊन पाठिंबा देतो, आणि तो तुमचा टील्लिया नितेश राणे मुस्लिमांना मशिदीत घुसून मारण्याची भाषा करतो, त्यावेळेस नाही आठवत तुम्हाला मुस्लिम समाज , त्याचं साधं निषेध करण्यासाठी तुमची जीभ काय घशात पडली होती की काय. ते मूठ भर लोक तुमचे बगलबच्चे स्वतःला मुस्लिम समाजाचे नेते मिरवून घेत आहे आणि त्यांना दिवसा आमदार झाल्याचे स्वप्न पडत आहे, जे स्वतःच्या फायद्यासाठी मुस्लिम समाजाला भाजप च्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न करत आहे,

ज्यांना आमदारकीचा गाजर दिलं ना तुम्ही ते ऐकतील तुमचं, पण हा बीड जिल्ह्याचा बहाद्दर मुस्लिम समाज ,भाजपा च्या मांडी ला मांडी लावून बसलेल्या तुमचं आणि तुमच्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी ला कधी ही भीक घालणार नाही,

आणि ते मुस्लिम समाजाचे मुंबई चे नेते ज्यांनी काँग्रेस शी गद्दरी करून भाजप चा मित्र पक्षासोबत घरोबा करून इथ येऊन सांगतात की मी अजित दादकडून अल्पसंख्यांक समाजाला सत्तेत भागीदारी मागणार , वाह रे नेते भागीदारी आणि कुणासोबत त्या मुस्लिम द्वेशी भाजपा सोबत, सिद्दीकी साहेब एवढंच तुमचं दादा ऐकत असतील तर त्यांना सांगा की मुख्यमंत्री ला सांगून त्या रामगिरी महाराज आणि नितेश राणे ला मुस्लिम समाजाबद्दल आणि आपल्या प्रेषित मोहम्मद सल्लालाहु आलय व सल्लम बद्दल प्रक्षोभक विधान केल्याबद्दल अटक करायला सांगा, उगच भाजपा च्या सांगण्यावरून कोणते ही मुस्लिम अल्पसंख्यांक समाजाचे मेळावे घेऊन काही फायदा होणार नाही आपल्या ह्या भुलथापाला बीड जिल्ह्याचा मुस्लिम समाज बळी पडणार नाही आणि येणाऱ्या विधान सभेच्या निवडणुकीत हा मुस्लिम समाज मताची भीक घालणार नाही, आणि ठणकावून सांगतो की जी चूक आम्ही लोकसभेला केली तीच चूक आम्ही विधानसभेला सुद्धा करणार आणि एक वेळेस नाही तर शंभर वेळा तीच चूक करणार आणि भाजप प्रणित महायुती ला बीड चा बहाद्दर मुस्लिम मतदार कदापि मताची भिक घालणार नाही.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक–आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक १७ ■ मंगळवार १० सप्टेंबर २०२४ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक ११ सप्टेंबर २०२४ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 17 ■ Tuesday 10 September 2024 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-169/2022-2024


## ‘लोकपोल’ सर्वेक्षणाचा खळबळजनक खुलासा!

# महाविकास आघाडीची दीडशे पार मुसंडी महायुतीची होणार घसरगुंडी

मुंबई (सरकार): महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, विरोधी आघाडी महाविकास आघाडी,भारतीय जनता पक्ष नेतृत्वाखालील राजकीय पराभव देऊ शकते.निवडणूक सर्वेक्षणातून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत, विरोधी आघाडी महाविकास आघाडी भारतीय जनता पक्ष नेतृत्वाखालील ला राजकीय पराभव देऊ शकते. लोकमतच्या निवडणूक सर्वेक्षणातून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. चला, झोननुसार, निवडणूक सर्वेक्षणात काय समोर आलंय ते जाणून घेऊयात.

लोक पोलच्या सर्वेक्षणाच्या निष्कर्षातून समोर आलंय की, महाराष्ट्रात सत्तेत असलेल्या महायुतीला ११५ ते १२८ जागा मिळू शकतात, तर त्यांची मतं ३८–४१ टक्के असू शकतात. सर्वेक्षणाच्या निष्कर्षातून असं समोर आलं आहे की, विरोधात असलेल्या महाविकास




आघाडीला १४१–१५४ जागा मिळू शकतात, तर त्यांची मतं ४१– ४४ टक्के असू शकतात. महाराष्ट्रावर झालेल्या लोकनिवडणुकीच्या ग्राउंड सर्व्हेनुसार, इतरांना तेथे पाच ते १८ जागा मिळू शकतात आणि मतांची टक्केवारी १५ – १८ टक्के असू शकते. लोक पोलनं महाराष्ट्रात झोननिहाय (एकूण ६ झोन) केलेल्या सर्वेक्षणाचा निष्कर्ष समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावेळी अतिशय खळबळजनक माहिती समोर आली आहे.

पहिला झोन विदर्भ आहे. इथे ६२ विधानसभा निवडणुकीच्या जागा आहेत. तिथे महायुतीला १५ ते २०, महाविकास आघाडीला ४०–४५ आणि इतरांना एक ते पाच जागा मिळू शकतात, असं समोर आलं आहे. तिथे लोकांचा कौल काँग्रेसच्या बाजूनं झुकल्याचं समोर आलं आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मतदारांचे ग्रामीण भागातील समस्यांसह एकत्रीकरण हा एक महत्त्वाचा घटक आहे. सोयाबीन आणि कापसाच्या भावाबाबत तेथील शेतकरी प्रचंड संतापले आहेत. दुसरा झोन खान्देश असून तिथे राज्यातील विधानसभेच्या ४७ जागा आहेत. तिथे सत्ताधारी महायुतीला २०–२५, महाविकास आघाडीला २०–२५ आणि इतरांना शून्य ते दोन जागा जिंकता येतील. खान्देशातील एसटी पट्टा चत– ला पाठिंबा देत आहे, परंतु उर्वरित प्रदेशात, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं मजबूत नेतृत्व आणि उपस्थिती छऊ– ला मदत करेल. मात्र, कांदा लागवड करणारे शेतकरी सध्याच्या सरकारवर नाराज आहेत. त्यामुळे त्यांचा कौल महाविकास आघाडीला मिळू शकतो.

तिसरा झोन म्हणजे, ठाणे–कोकण. या भागात विधानसभेच्या ३९ जागा आहेत. तिथे एनडीएला २५–३० जागा मिळू शकतात, एमव्हीएला पाच ते १० जागा आणि इतरांना एक ते तीन जागा मिळू शकतात. या भागात महाविकास आघाडीचं नेतृत् फारसं मजबूत दिसत नाही, त्यामुळे कोकण पट्ट्यात एनडीएचा गड आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना, शेकाप आणि सीपीआय(एम) च्या प्रभावामुळे देखील एमव्हीए प्रासंगिक बनलं आहे.


तिसरा झोन म्हणजे, ठाणे–कोकण. या भागात विधानसभेच्या ३९ जागा आहेत. तिथे एनडीएला २५–३० जागा मिळू शकतात, एमव्हीएला पाच ते १० जागा आणि इतरांना एक ते तीन जागा मिळू शकतात. या भागात महाविकास आघाडीचं नेतृत् फारसं मजबूत दिसत नाही, त्यामुळे कोकण पट्ट्यात एनडीएचा गड आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना, शेकाप आणि सीपीआय(एम) च्या प्रभावामुळे देखील एमव्हीए प्रासंगिक बनलं आहे.

चौथा झोन मुंबई आहे. या भागांत विधानसभेच्या ३६ जागा आहेत. सत्ताधारी महायुतीला १० ते १५, महाविकास आघाडीला २० ते २५ आणि इतरांना शून्य ते एक जागा मिळू शकते. मुंबईत उच्चभ्रू विरुद्ध मध्यमवर्गीय असा निवडणुकीचा मूड असतो. उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वाखालील शिवसेनेकडे मुंबईतील सर्व मराठी मतं पाहायला मिळेल. तर काँग्रेसला मुस्लिम वोटबँकचा फायदा मिळेल. अशातच भारत जोडो न्याय यात्रेचा काँग्रेसला मोठा फायदा झाल्याचंही पाहायला मिळत आहे. असं असलं तरीदेखील मुंबईत मोठा गुजराती वर्ग आहे आणि त्याचा कल भाजपच्या बाजूनं झुकलेला आहे. पाचवा झोन पश्चिम महाराष्ट्र आहे, ज्यातंर्गत ५८ विधानसभेच्या जागा येतात. जिथे एनडीएला २० ते २५, महाविकास आघाडीला ३० ते ३५ आणि इतरांना एक ते पाच जागा मिळण्याची शक्यता आहे. बारामतीमध्ये मात्र शरद पवारांचीच हवा असल्याचं पाहायला मिळत आहे. तर कोल्हापुरात काँग्रेसला फायदा झाल्याचं पाहायला मिळत आहे. शेवटचा आणि सहावा झोन मराठवाडा आहे. जिथे ४६ जागा आहेत. एनडीएला १५ ते २०, महाविकास आघाडीला २५ ते ३० आणि इतरांना शून्य ते दोन जागांवर विजय मिळू शकतो. मराठी मतं सध्या जास्तीत जास्त महाविकास आघाडीच्या बाजूनं झुकल्याचं पाहायला मिळत आहे. इथेही शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. जे सध्या सत्तेत असलेल्या महायुती सरकारला फटका देऊ शकतात.

## कब्रस्तान अतिक्रमण प्रकरणी

# गेवराई तहसील कार्यालयासमोर आक्रोश आंदोलन

### पालकमंत्र्यांचा फोन पण... आंदोलनकर्ते ठाम,आंदोलन सुरूच

### तहसीलदार खोमणे पाच तास आंदोलनाच्या ठिकाणी फिरकलाच नाही

## गेवराईचे कार्यसम्राट आमदार लक्ष्मणरावजी पवार आंदोलनाच्या ठिकाणी आलेच नाही भावी आमदार होण्याचे स्वप्न पाहणारा तरूण नेता ही दिसला नाही







बीड (सरकार): गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानावर अतिक्रमण काढण्यासाठी शासन दरबारी तक्रारी करण्यात आल्या होत्या. जिल्हाधिकाऱ्यांनीही गेवराई तहसीलदारांना आदेश दिले. परंतु त्या आदेशाला काळिमा फासण्याचे काम गेवराई तहसीलदार यांनी केले आहे. त्यामुळे कुठेतरी तहसीलदार यांचा कब्रस्तानच्या अतिक्रमणा संदर्भातील हेतू शासनाच्या आदेशाच्या संदर्भात प्रामाणिक नाही का? जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला न पाहणारे गेवराईचे तहसीलदार यांच्यावर कारवाई करावी व येथील कब्रस्तानवरील तात्काळ अतिक्रमण काढण्यात यावे या मागणीसाठी आज गेवराई तहसील कार्यालयासमोर मुस्लीम समाजाने आक्रोश आंदोलन केले. या आंदोलनाला विविध सामाजिक संघटनेने पाठिंबा दिला. आंदोलनाच्या ठिकाणी गेवराई तहसीलदार संदीप खोमणे पाच तास फिरकलाच नसल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सदरील कब्रस्तानावरील अतिक्रमणाचे गांभीर्य पाहून गेवराई तहसीलदारांना तातडीने सूचना कराव्यात आणि कारवाई करावी अशी मागणी या ठिकाणी करण्यात आली.

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानवर गेल्या अनेक दिवसांपासून अतिक्रमण करून घरोबा करण्यात आला आहे. या संदर्भात येथील मुस्लीम समाजाने शासन दरबारी तक्रार दिली आहे. या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी यांनी गेवराईचे तहसीलदार संदीप खोमणे यांना अतिक्रमण काढण्यासाठी आदेशीत केले आहे. मात्र गेवराई तहसीलदार या आदेशाला पायाखाली तुडवित अतिक्रमण धारकाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत आहेत की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तहसीलदार खोमणे आतिक्रमण धारक यांच्यात नेमका काय संबंध आहे. का अतिक्रमण काढले जात नाही. त्याचबरोबर आदेशाचे पालन का केले जात नाही, या सर्व गोष्टीची जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतंत्र समिती नेमून चौकशी करावी. त्याचबरोबर सकाळपासून तहसील कार्यालयासमोर मुस्लीम समाज आक्रोश करत आहे. या आंदोलनाला विविध सामाजिक संघटनेने पाठिंबा दिला. मात्र या आंदोलनाच्या ठिकाणी माजी आमदारासह अनेक नेते उपस्थित आहेत. मात्र गेवराईचे कार्यसम्राट आ.लक्ष्मण पवार या आंदोलनाच्या ठिकाणी फिरकलेच नाहीच. त्याचबरोबर व त्यांच्या परिवारातील कोणता सदस्य या ठिकाणी दिसून येत नाही. त्यामुळे आ.लक्ष्मण पवारांनी तलवाडा येथील मुस्लीम समाज बांधवांच्या भावना लक्षात घेतल्या नाहीत का? माहिती असतानाही मुस्लीम समाज बांधवांना या ठिकाणी भेटण्यासाठी वावडे आहे का? असा प्रश्न उपस्थित होत असताना एक प्रकारचा नाराजीचा सूर आंदोलनकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. त्याचबरोबर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी आंदोलनकर्त्यांना भ्रमणध्वनीवरून काही काळात कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

मात्र आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्र्यांच्या आश्वासनाला न जुमानता आंदोलनावर ठाम राहीले. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानच्या संदर्भातील संवेदनशीलता पाहता तातडीने निर्णय घ्यावा. जिल्हा प्रशासनाचे आदेश न पाळणाऱ्या तहसीलदारावर तातडीने कारवाई करावी. त्याचबरोबर कब्रस्तानावरील अतिक्रमणा संदर्भात तातडीने मार्ग काढावा अशी मागणी मुस्लीम समाजामध्ये होत आहे.

## मनोज जरांगे पाटील १७ सप्टेंबरपासून उपोषण करणार

जालना (सरकार): राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी एक मोठी घोषणा केली आहे. मनोज जरांगे हे येत्या १७ सप्टेंबरपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा एकदा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मनोज जरांगे (चरपेक्ष गरीरपसश झरींळश्र) यांनी मंगळवारी जालन्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना ही घोषणा केली. मनोज जरांगे यांनी याआधी आपण २९ सप्टेंबरला आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला होता. मात्र, आता मनोज जरांगे हे १७ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करणार आहेत.



मनोज जरांगे पाटील यांच्या आंतरवाली सराटीतील यापूर्वीच्या आंदोलनामुळे महायुती सरकारची कोंडी झाली होती. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे लोण राज्यभरात पसरले होते. लोकसभा निवडणुकीत याचा फटका महायुतीला बसला होता. मराठा आमदारांनी महायुतीच्या उमेदवारांविरोधात कौल दिल्याने अनेक जागांवर सत्ताधारी आघाडीचे उमेदवार पडले होते. यामध्ये पंकजा मुंडे आणि रावसाहेब दानवे यांच्यासारख्या मातब्बर उमेदवारांचा समावेश होता. मनोज जरांगे यांनी मध्यंतरी विधानसभा निवडणुकीत राज्यभरात २८८ उमेदवार उभा करण्याची घोषणा केली होती. यानंतर आता मनोज जरांगे पाटील हे घोंगडी सभा घेऊन वातावरण तापवत आहेत. मात्र, आता मनोज जरांगे पाटील हे मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या दिवशी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा मुद्दा नव्याने तापू शकतात. तसे घडल्यास यावर भाजप आणि महायुती सरकार काय प्रतिक्रिया देणार, हे पाहावे लागेल.

## दरोड्याच्या तयारीत असलेल्या चौघांच्या अंभोरा पोलिसांनी मुसक्या आवळल्या

आष्टी (सरकार): तालुक्यातील धामणगाव शिवारात रविवारी (दि.८) रात्री साडेदहा ते अकरा वाजेच्या दरम्यान दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या टोळीच्या अंभोरा पोलिसांनी मुस्क्या आवळल्या. या टोळीतील आठ जणांपैकी चौघांना पोलिसांनी दुचाकीसह मोठ्या शिताफिने ताब्यात घेतले. तर इतर चौघेजण मात्र अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. या दरोडेखोरांकडून विना क्रमांकाच्या चार दुचाकी, किंमती मोबाईल, लोखंडी गज, कत्ती, धारदार शस्त्र असा एकूण चार लाख सत्तर हजाराचा ऐवज जप्त करण्यात आला.

याबाबत अंभोरा पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, आष्टी तालुक्यातील धामणगाव शिवारात रविवारी (दि.८) रात्री साडेदहा ते अकरा वाजेच्या सुमारास संशयित आठजणांची टोळी एका हॉटेल परिसरात असल्याची गोपनीय माहिती सपोनी मंगेश साळवे यांना प्राप्त झाली. या माहितीच्या आधारे अंभोरा पोलिसांनी तात्काळ विनाविलंब घटनास्थळी धाव घेतली असता, त्या ठिकाणी विशाल अनिल कंधारे (वय २४ रा. वारजे दांगट ईस्ट राजनंदनी कॉम्प्लेक्स फ्लॅट नंबर–१०७ ता. हवेली जि. पुणे) अमर बाबासाहेब हजारे (वय ३० रा. वाघाळा ता. अंबाजोगाई जि. बीड, हल्ली मुक्काम साई समृद्धी आपारमेंट शिवणे देशमुखवाडी ता. हवेली जि. पुणे) अमित अण्णागोंडा पाटील (वय – ३० रा. रामनगर शिवाजी चौक वारजे, माळवाडी ता. हवेली जि. पुणे), तुषार आनंद भरोसे (रा. वारजे माळेवाडी पुणे) या चौघांना दरोड्याच्या तयारीत असताना अंभोरा पोलिसांनी एका हॉटेल जवळून जागीच ताब्यात घेतले.

मंगळवार दि.१० सप्टेंबर २०२४

बीड सरकार



# संपादकीय

## सरसंघचालकांचे तरी ऐका

'मणिपुरातील परिस्थिती सुरळीत व्हावी यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न' करण्याचे आवाहन साक्षात सरसंघचालक मोहनराव भागवत यांनी केले त्यास मंगळवारी (१० सप्टेंबर) तीन महिने होतील. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर आठवडाभरात (१० जून) भागवत यांनी सरकारला मणिपुरातील परिस्थिती किती गंभीर आहे याची जाणीव करून दिली आणि तेथील 'आग विझवण्यासाठी' त्वरा करण्याची गरज व्यक्त केली. त्याआधी अनेक पत्रकार, समाजाभ्यासक, विरोधी पक्षीय राजकारणी इत्यादींनी मणिपुरातील परिस्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. या सर्वांस सरकार नेहमीच कस्पटासमान लेखते याचा अनुभव अनेकदा आलेला आहेच. पण दस्तुरखुद्द सरसंघचालक मणिपूरबाबत जाणीव करून देत असताना त्यांच्या म्हणण्याकडे तरी सरकार दुर्लक्ष करणार नाही, अशी आशा होती. ती फोल ठरताना दिसते. कारण सरसंघचालकांनी भाष्य केल्यानंतरच्या तीन महिन्यांत त्या राज्यातील परिस्थिती अधिकच चिघळत गेली असून आता तर 'युद्ध'च सुरू आहे की काय असे वाटावे असे चित्र आहे. थेट माजी मुख्यमंत्र्यांच्या घरावर हल्ला काय, ड्रोनने मारगिरी काय, लष्करावर ड्रोन-विरोधी यंत्रणा तैनात करण्याची वेळ येणे काय आणि माजी लष्करी जवानांच्या हत्या काय! इतकी अनागोंदी देशात अन्यत्र कोठेही नाही. पण तरीही या सीमावर्ती महत्त्वाच्या राज्याकडे लक्ष देण्यास ना पंतप्रधानांस वेळ आहे ना त्यांच्या अन्य मंत्र्यांस. आता तर राज्याचे निष्प्रभ, निष्क्रिय आणि निलाजरे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह हे त्या राज्यातील लष्करासह सर्वच सुरक्षा यंत्रणा राज्याच्या अखत्यारीत हवी अशी मागणी करतात आणि तरीही केंद्र सरकार त्यावर 'ब्र'ही काढत नसेल यास काय म्हणावे? त्या राज्यात भाजपच्या ऐवजी अन्य कोणा पक्षाचे सरकार असते तर केंद्र सरकार इतके क्षमाशीलता दाखवते काय? पश्चिम बंगालमधील शांततेत गुंतलेला आपला जीव काही प्रमाणात तरी मणिपूरकडे केंद्राने वळवायला नको काय? हे प्रश्न पडतात कारण एकीकडे 'पाकव्याप्त काश्मिरातील नागरिकांनी भारतात सामील व्हावे' असे आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह करतात. त्याआधी सार्वत्रिक निवडणुकांच्या तोंडावर गृहमंत्री अमित शहा हेही आपण पाकव्याप्त काश्मिरास भारताचा भाग बनवण्याबाबत भाष्य करतात. तसे होईल तेव्हा होईल. पण ते होईपर्यंत आहे त्या भारतात- आणि त्यातही सीमावर्ती राज्यांत- शांतता राखण्याचे काय?

मणिपूर या राज्यातील परिस्थिती चिघळत गेली त्यास आता जवळपास १६ महिने होतील. इतका काळ राज्यात सर्वत्र सुरक्षा दलांचा खडा पहारा कायम आहे आणि नागरिकांस मोकळेपणाने वावरण्याचे स्वातंत्र्य अजूनही नाही. तेथील हिंसाचाराच्या पहिल्या लाटेत अडीचशेहून अधिक बळी गेले आणि आताही गेल्या आठवडाभरात अर्धा डझन जिवांनी प्राण गमावले. इतकेच नाही. अनेकांच्या मुली, बहिणी, माता अशा अनेकींनी लैंगिक अत्याचार सहन केले. त्यातील काही अब्रू घालवून जिवंत तरी राहिल्या. अनेकींनी प्राण गमावले. आज जवळपास सव्वा वर्षानंतर त्या राज्यातील ५० हजारांहून अधिक नागरिकांना सरकारी छावण्यांत राहावे लागते. तेथेही त्यांच्या हालअपेष्टांना वाली नाही. कारण सरकारी मदतीतही उघडउघड दुजाभाव सुरू आहे. त्या राज्यातील परिस्थितीची वर्णने वाचली तरी अंगावर शहारा येतो. अशा परिस्थितीत ज्यांना जगावे लागते त्यांचे काय होत असेल हा प्रश्नही केंद्र सरकारास पडत नसेल तर कठीणच म्हणायचे.

मणिपुरातील मागास जाती/जमाती, त्यांच्यातील आरक्षण स्पर्धा अशा साध्या वाटणाऱ्या वादांत गतसाली सुरू झालेल्या हिंसाचारात तेथील कुकी आणि मैतेई समाजाच्या गटांनी सरकारी शस्त्रागारे लुटली. सरकारी अभय मिळालेल्या मैतेईंनी मग वेचून वेचून कुकींस मारणे सुरू केले. परिस्थिती इतकी गंभीर बनली की सरकारी कर्मचाऱ्यांतही हा दुभंग उफाळून आला आणि या दोन समाजाच्या कर्मचाऱ्यांनी परस्पर विरोधी भागांत काम करण्यास नकार दिला. उभय समाजांचे 'कार्यकर्ते' मैतेई व कुकीबहुल जिल्ह्यांत शस्त्रे चोरत असताना संबंधित समाजांच्या सरकारी कर्मचाऱ्यांनीच ते 'आपल्या' समाजाचे आहेत म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे हे आंदोलक इतके निर्धास्त झाले की शांतता प्रस्थापित करण्यास पाचारण केलेल्या लष्करावरही त्यांनी निर्धास्तपणे हात उचलला. अन्य राज्यांतही असे कधी घडत नाही. ते अनेकदा मणिपुरात घडले. विशिष्ट समाजाच्या महिलांवर हल्ला करून त्यांची विवस्त्र धिंड काढण्याचा प्रकार घडला तो त्यातून. अखेर केंद्रीय गृहमंत्र्यांवरही जे झाले त्याची दखल घेण्याची वेळ आली. पण त्यांच्या तेथील वास्तव्यानंतरही परिस्थितीत काडीचाही बदल झाला नाही. 'लोकसत्ता'ने गतसाली 'ईशान्येची आग' ( ५ एप्रिल), 'डबल इंजिनाचे मिथक' (१० मे), 'मुख्यमंत्र्यांना हाकलाच' (३१ मे), 'सिंह आणि सिंग' (२० जून), 'समर्थांची संशयास्पद संवेदना' (५ मे '२४) अशा विविध संपादकीयांतून त्या अभागी मणिपुरींची व्यथा मांडली.

ती १६ महिन्यांनंतरही दूर होताना दिसत नाही. त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे केंद्रातील सत्ताधारी भाजपचे मणिपुरातील नेते मुख्यमंत्री बिरेन सिंह. बऱ्याच पक्षांचे पाणी पिऊन आलेला हा सिंह सध्या भाजपच्या कळपात आहे. स्थानिक प्रादेशिक पक्ष, मग काँग्रेस असे हिंडत हे सिंह भाजपत आले आणि भाजपच्या गरजांप्रमाणे हिंदू-ख्रिश्चन दुहीचा खेळ खेळू लागले. एकेकाळी हे सिंह फुटबॉल खेळत. राज्यातील गंभीर समस्येवरही ते आपल्या पूर्वानुभावाने लाथाच झाडताना दिसतात. मणिपुरातील कुकी आणि मैतेई समस्येचा त्यांनी पार खेळखंडोबा केलेला आहे. ते उघडपणे हिंदू मैतेईंचा पत्कर घेताना दिसतात आणि आपल्याच राज्यातील कुकी आणि झो या बहुसंख्य ख्रिश्चन समुदायांस वाऱ्यावर सोडण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. म्हणून तर परिस्थिती इतकी चिघळली. आता तर परिस्थिती अशी की डोंगराळ भागात जेथे कुकी समाजाचे प्राबल्य आहे तेथे खोऱ्यांच्या प्रदेशात मैतेई जाण्यास तयार नाही. मणिपुरी सरकारी कर्मचारी कुकी असेल तर तो मैतेईंचे प्राबल्य असलेल्या प्रदेशांत सरकारी सेवेस तयार नाही. इतकी बिकट परिस्थिती निवळावी, हिंसाचार थांबावा म्हणून गृहमंत्री अमित शहा यांनी तेथे जाऊन प्रयत्न करूनही काडीचाही फरक पडला नाही. त्यानंतर एकदा पंतप्रधानांनी त्या राज्यातील स्थितीबाबत भाष्य केले खरे. पण ते तितकेच. नुसतीच शब्दसेवा. पुढे काहीही घडले नाही. इतकेच काय परदेशांतूनही चिघळत्या मणिपूरबाबत अनेकांनी चिंता व्यक्त केली. पण आपले सरकार ढिम्म. इतके की खुद्द सरसंघचालकांस तीन दिवसांपूर्वी (६ सप्टेंबर) पुन्हा एकदा मणिपुरातील परिस्थितीची जाणीव करून द्यावी लागली. बाकी काही कोणाचे ऐकले न ऐकले तरी ठीक. पण विद्यमान भाजप सरकारने निदान सरसंघचालकांचे तरी ऐकायला हवे. निवडणुकीच्या काळात भाजप अध्यक्ष जयप्रकाश नड्डा यांनी ''आता पक्ष मोठा झाला त्यास संघाची आता गरज नाही'', अशा अर्थाचे विधान केले होते. तसा तो झाला असेलही. तो किती मोठा झाला हे लोकसभा निवडणुकांनी दाखवून दिले. पण म्हणून भाजपने आपल्या विचारकुलप्रमुखांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गेल्या १६ महिन्यांत कधी मणिपुरात गेलेले नाहीत. तूर्त ते युक्रेन-रशिया, हमास- इस्रायल आदी युद्धे मिटवण्यात व्यग्र असतील. तेथील शांततेसाठी प्रयत्न करता करता सरसंघचालकांच्या सूचनेकडेही त्यांनी लक्ष दिल्यास मणिपुरी जनता आणि समस्त भारतीयही त्यांचे आभारी राहतील.

# मी, मोबाईल व काम !!

मोबाईलमुळे कामात व्यत्यय, त्रुटी अशा होतच असतात. लक्ष विचलित होते, याची आपणास जाणीवही होत नाही. पण, खोलवर विचार केल्यावर जाणवते की, मोबाईल आपणाशी तनामनाने जोडलेला आहे.



अचानक स्मार्टफोन बंद झाला. फोनचा नेटवर्कच नाही आहे, तर एकदमच हृदयाचा ठोका चुकेल की काय असे होऊन जाते. एवढे आपण स्मार्टफोनशी गुंतलेले आहोत. स्टेशन, मॉल व इतरत्र सगळीकडे लोक आपल्याच फोनमध्ये बघत असतात. आजूबाजूला काहीच लक्ष नसतं किंवा मित्रांशी गप्पा करतानाही बराच वेळ फोनकडे लक्ष लागून राहते. मानसशास्त्रज्ञांनी अशा मानसिकतेचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की, फोन हा मनुष्यास त्याच्या नावाप्रमाणेच भासतो. म्हणजेच जर तुम्ही एखाद्या गोष्टीत खूपच मग्न आहात आणि जर तुम्हाला तुमच्या नावाने कुणी हाक दिली, तर जसे तुम्ही सतर्क होता अगदी त्याचप्रमाणे तुम्ही फोनला प्रतिक्रिया देता. हे आपले लक्ष विचलित होण्यास कारणीभूत ठरते.

आपल्याजवळ असणा-या फोनमुळे आपले कामात लक्ष लागत नाही. त्यामुळे करणा-या कामाचा दर्जा थोडय़ाफार तरी प्रमाणात कमी होतो. हे अनेक संशोधनात सिद्ध झालेले आहे.

माझ्या मित्राची एक छोटी कंपनी आहे. त्यात एकूण १०-१२ लोक काम करतात. त्यांच्या कामात त्रुटी होतच असतात, असं माझ्या मित्रांचं निरीक्षण होतं. मानसोपचार तज्ज्ञ म्हणून तू काहीतरी सल्ला दे. काहीतरी प्रेरणापूर्वक कार्यशाळा घेण्यास त्याने मला निवेदन केले. त्याच्या कंपनीत जाऊन मी सर्वांची थोडीशी माहिती घेतली. सर्वच कामात उत्सुक व जबाबदारीने काम करणारे होते. माझ्याशी बोलत असताना, अगदी अदबीने त्यांचा फोन वाजला, तर काहींनी फोनवर बोलणे महत्त्वाचे समजले. काहींनी ते टाळण्याचा प्रयत्न केला, पण ते विचलित झाले होते. काही अगदी फोनला किंवा कामाला त्रासले होते. फोन का लक्ष विचलित करणारा एक कॉमन घटक वाटला. त्यांचे बरीच कामे ही ऑनलाईन होती, जे ती सर्व कॉम्प्युटरवर करीत होती. फोनचा व्यत्यय लक्षात घेता, त्यांना काही मजेशीर कल्पना वापरण्यास सांगितले. पहिल्यांदा लंचटाइम हा विनामोबाईल करायचा. लंचटाइममध्ये सर्वांचेच मोबाईल चक्क एका दुस-या रूममध्ये ठेवायचे. नंतर सकाळचे दोन तास मोबाईलविना काम करायचे, असं टप्प्याटप्प्याने ते आणि काम असंच समीकरण करायचे होते. पण हे करत असताना जाचक अनिवार्य नियमावली केली नाही. मोबाईलपासून लांब असताना त्यांना कामात किती आनंद वाटला.

एकत्र गप्पा मारत लंच करताना काय वाटले? असा अभिप्राय सर्वाकडून घेतच होतो. सुरुवातीला हे सर्वानाच कठीण वाटत होते, पण नंतरच्या अभिप्रायात ते सर्वानाच आवडायला लागले होते. मुख्यत: काम करत असताना येणारा व्यत्यय कमी होत होता. त्यामुळे थोडा आनंदी होऊन कामात उत्साह वाटत होता. या अभिप्रायानुसारच काम करताना मोबाईल बंद करावा किंवा लॉकरमध्ये ठेवावा असं ठरवायचे होते. सर्व मतानुसार एक महिन्यासाठी, सर्वानीच काम करीत मोबाईल बंद ठेवण्याचा ठराव केला. त्यातही एक महिना मोबाईलबरोबर घेऊन काम करावे व एक महिना बिनामोबाईल काम करावे असे ठरविण्यात आले. या प्रयोगानंतर सर्वाकडून आलेल्या अभिप्रायानुसार विनामोबाईल काम करत असताना त्रुटी कमी होतात, असे निदर्शनास आले. मोबाईल फोनशी जोडला गेल्यावर नकळतच कामात व्यत्यय, त्रुटी अशा होतेच असतात. लक्ष विचलित होत असते. याची आपणास जाणीवही होत नाही. याचा खोलवर विचार केल्यावर जाणवते की, मोबाईल हा आपल्याशी तनामनाने जोडलेला आहे.मोबाईलचा वापर खालील वेळी आवर्जून होतोच..

**रिकाम्यावेळी :** जेव्हा काहीच करत नसतो किंवा मित्राची, बस, ट्रेनची वाट पाहत असतो तेव्हा.ओशाळलेल्या अवस्थेत, जेव्हा परिस्थिती बिकट होते. काय करावे कळत नाही.

**जेव्हा एखाद्या फोनची किंवा मेसेजची वाट पाहत असतो.**

खूप रटाळ काम करण्याच्या अगोदर किंवा नंतर वरील परिस्थितीत मोबाईल तारक ठरत असतो. म्हणून तो अगदी घट्ट मित्र झालेला असतो. यातून बाहेर निघायचे असेल तर वरील परिस्थितीत मोबाईल व्यतिरिक्त अजून काहीतरी करायला हवे.

# पुणे-हुबळी वंदेभारत एक्स्प्रेसला मंजुरी



पश्चिम महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकाला जोडणारी पुणे-हुबळी वंदेभारत एक्स्प्रेसला मंजुरी मिळाली असून या गाडीला सांगली व मिरज स्थानकावर थांबा देण्यात आला असल्याची माहिती माजी खासदार संजयकाका पाटील यांनी दिली.

पश्चिम महाराष्ट्रात रेल्वेचे विद्युतीकरण झाल्यानंतर या मार्गावरून अधिक वेगवान गाड्या सुरू करण्याची मागणी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव व तत्कालीन राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत रेल्वे विभागाने पुणे ते हुबळी दरम्यान वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. पहाटे पाच वाजता हुबळीहून सुटणारी वंदे भारत धारवाड, बेळगाव, मिरज, सांगली, सातारा स्थानकावरील थांबा घेत दुपारी दीड वाजता पुण्यात पोहचणार आहे, तर परतीच्या प्रवासात पुण्याहून निघणारी वंदे भारत दुपारी सव्वादोन वाजता निघून हुबळीमध्ये रात्री पावणेअकरा वाजता पोहचेल. ही गाडी सोमवार वगळता रोज धावणार असून, संपूर्ण वातानुकूलित आठ कोच आहेत. हुबळी ते पुणे हे ५५८ किलोमीटर अंतरासाठी वंदेभारत एक्स्प्रेसला साडेआठ तास लागणार आहेत.

## आहारात लसणाचे फायदे

**लसूण आणि कोलेस्ट्रॉल:** लसणात असलेले एलिसिन नावाचे तत्व कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करते. लसूण ठेचून किंवा चिरल्यावर लिसिन तयार होते. हा घटक शरीरातील कोलेस्टेरॉलचे उत्पादन कमी करतो आणि रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्टेरॉल जमा होण्यास प्रतिबंध करतो.

१. कच्चा लसूण: कच्च्या लसूणमध्ये सर्वात जास्त प्रमाणात लिसिन असते. तुम्ही ते सॅलडमध्ये घालून किंवा थोड्या पाण्यात उकळून खाऊ शकता. २. लसूण चटणी: लसूण चटणी रोटी, पराठा किंवा भाजीसोबत खा.३. लसणाची भाजी: लसणाची भाजी, लसूण डाळ इत्यादी भाजी बनवण्यासाठी लसूण वापरा.४. लसणाचे लोणचे: लसणाचे लोणचे सुद्धा चवदार आणि आरोग्यदायी असते. ५. लसणाचे तेल: लसणाचे तेल जेवणात वापरले जाऊ शकते.

**फायदे:** १. रक्तदाब नियंत्रित करते: लसूण रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करतो.२. प्रतिकारशक्ती वाढवते: लसूण शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते.३. कर्करोग प्रतिबंधित करते: काही अभ्यासातून असे दिसून आले आहे की लसूण विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाचा धोका कमी करण्यास मदत करू शकतो.

४. पचन सुधारते: लसूण पचन सुधारते आणि अपचनापासून आराम देते.लक्षात ठेवण्याच्या गोष्टी: लसूण जास्त प्रमाणात खाऊ नका, कारण यामुळे पोट खराब होऊ शकते.

# देणाऱ्याचे हात हजारो

भगवद्गीतेतील एक अत्यंत महत्त्वाचे सूत्र कोणते? तर कर्म करत राहणे; परंतु ते 'मी' केले हा अभिमान नसणे. अशा वृत्तीने जो जगतो, तो ईश्वराशी एकरूप होतो, तोच ईश्वर होतो. या सूत्राचे सविस्तर आणि सुंदर वर्णन करतात ज्ञानदेव! कसे ते पाहूया आता. अठराव्या अध्यायातील या अप्रतिम ओव्यांमधून.

श्रीकृष्ण अर्जुनाला वरील सूत्र सांगतात. ते समजावताना येतात माऊलींच्या या ओव्या! 'हे पाहा, ज्याप्रमाणे आरशाने आरशाला पाहिले असता ते न पाहणे होते, किंवा सोन्याने सोने झाकले तर झाकणे होत नाही.'

**पैं दर्पणातें दर्पणें। पाहिलिया,**
**होय न पाहणें ।**
**सोनें झांकिलिया सुवर्णें।**
**न झांके जेविं।। (ओवी क्र. ११७५)**

'दिव्याने दिव्याला प्रकाशित केले तर ते प्रकाश न करणेच होय; त्याप्रमाणे माझ्याशी एकरूप होऊन कर्म केले ते कर्म करणे कसे म्हणावे?' (ओवी क्र. ११७६)'कर्म करीत असता मी कर्ता असा अभिमान नाहीसा झाला म्हणजे त्याचे सर्व करणे न करणेच होते.' भक्ताने अभिमान टाकून दिला, म्हणून तो देवाशी एक झाला. कशाप्रमाणे? तर आरशाप्रमाणे! दोन आरसे एकमेकांसमोर ठेवले तर कोण कोणाला पाहणार? ते न पाहणेच होणार. यात आरशाप्रमाणे असलेला भक्त हे उदाहरण किती नेमकं! आरसा हा स्वच्छ असतो. तो तुम्हाला प्रतिबिंब दाखवतो. भक्ताच्या मनातील मोह, माया, अभिमान इ. सारे विकार नाहीसे झाले, म्हणजे तो स्वच्छ, लख्ख झाला आरशासारखा. तो देवाकडे पाहतो. पण देव वेगळा राहिला आहे का? नाही, भक्ताच्या भक्तीमुळे, साधनेमुळे तो आणि भक्त एक झाले. म्हणजे देव हाही दुसरा आरसा. मग एक आरसा दुसऱ्या आरशाला कुठून पाहणार? हा भेदच तिथे संपला आहे. पुढचा दाखला देतात सोन्याचा. सोन्याने सोने झाकले कसे जाईल? भक्त हा सोन्यासारखा हे यातून सूचित होते. सोने हे किमती, चमकदार आणि तेजस्वी असा मौल्यवान धातू आहे. भक्ताच्या ठिकाणी हे सारे गुणविशेष आहेत. त्याच्या ठिकाणचे सर्व विकार नाहीसे झाले म्हणजे तो अतिशय तेजस्वी झाला. असा भक्त हा दुर्मीळ, मौलिक असतो. सोन्याला मोठी परीक्षा द्यावी लागते. जाळ सहन करावा लागतो. त्यातून ते अधिक तेजस्वी, चमकदार होते. साधकालाही साधनेच्या खडतर पायऱ्या पार व्हायला



हव्या, तेव्हा तो आदर्श भक्त या पदापर्यंत पोहोचतो. मग असा भक्त हा बावनकशी सोनं जणू! परमेश्वराहून असा भक्त वेगळा कसा राहील? म्हणजे सोने सोन्याने झाकले कसे जाईल? यानंतरचा दृष्टान्त दिव्याचा. दिवा म्हणजे तेजाचे प्रतीक. अंधार नाहीसा करणारा. भक्ताने भक्तीचा प्रवास करत मनातील अंधार नाहीसा केला. तो आता इतरांना प्रकाशित करतो आहे. ईश्वर तर स्वतः प्रकाशित, तेजस्वी तत्त्व. मग आता हे दोघे एक झाले (भक्त आणि देव) तर? कोण कोणाला प्रकाशित करणार? या दृष्टान्तातून उमगतं ज्ञानदेवांचे मोठेपण! आपल्यापुढील श्रोते ज्ञान घ्यायला उत्सुक आहेत. त्यांची ही उत्सुकता टिकवून ठेवणे, इतकेच नव्हे तर त्यांना अधिक ज्ञान घेण्याची उत्कंठा वाढवणे हे कार्य ज्ञानदेव करतात अशा सुंदर दाखल्यांच्या योजनेतून. त्याविषयी काय आणि किती बोलावे? त्यातून किती आणि काय घ्यावे!

**'देणाऱ्याचे हात हजारो**
**दुबळी माझी झोळी'**

# खरा देव : सद्गुरु वामनराव पै

नामस्मरण कसेही केले तरीही ते फळते हे खरे आहे, मात्र या प्रवासात जर कुणीतरी मार्गदर्शन करणारे मिळाले तर तुमची प्रगती लवकर होईल. तुकाराम महाराजांना देहधारी सद्गुरु नव्हते, पण त्यांनी जे नामस्मरण केले त्याला तोड नाही, त्यातूनच त्यांना साक्षात्कार झाला. रामकृष्ण परमहंसांनाही देहधारी सद्गुरू नव्हते. मी हे या आधीही खूप वेळा सांगितले आहे, परत सांगतो. तुकाराम महाराज, रमण महर्षी, रामकृष्ण परमहंस, समर्थ रामदास स्वामी यांना देहधारी सद्गुरू नव्हते. हा असा विचार केला की, हाही विचार केला पाहिजे की, तुम्ही त्यांच्यासारखे आहेत का? बरोबरी करताना आपण कोणाची बरोबरी करू शकतो, हा ही विचार मनात यायला पाहिजे. ही सगळी मंडळी खूप थोर होती. आपल्यासारख्या लोकांना तर त्यांच्या पायाच्या नखाचीही सर नाही. तुम्ही म्हणाल आम्ही ठरवले तर आम्ही पण करू ह्यांच्यासारखे नामस्मरण. होईल शक्य? समर्थ रामदास स्वामींनी किती नामस्मरण केले तेही पाण्यात उभे राहून. रामकृष्ण परमहंसांनी किती तरी तपश्चर्या केली, तेव्हा त्यांना साक्षात्कार झाला. ह्यांच्याशी बरोबरी कशी साधायची? रामकृष्ण परमहंस पैशांना हातही लावत नव्हते. त्यांच्याकडे एवढी विरक्ती होती. तुम्ही सांगा हे तुम्हाला जमेल का? तुम्ही व ते सारखे का?

एकदा स्वामी विवेकानंदांनी त्यांची परीक्षा पहिली. रामकृष्ण परमहंस गाढ झोपेत होते. रात्री अडीच तीनची वेळ, अत्यंत गाढ झोपेची. ह्याच वेळेला बहुतेक चोऱ्या होतात. रामकृष्ण परमहंस गाढ झोपेत, दोन्ही हात उघडे ठेवून झोपले होते. स्वामी विवेकानंदांनी त्यांच्या हातावर रुपयाचे नाणे ठेवले. मात्र झोपेतही त्यांचा हात पालथा झाला व ते पैसे खाली पडले. आता तुम्ही स्वतःचा विचार करा. एखादा सामान्य माणूस गाढ झोपेत असताना कोणीतरी त्याच्या हातात पैसे ठेवले तर? गाढ झोपेत असूनही त्याच्या हाताच्या मुठी बंद होतील व तो हात खिशाकडे जाईल. कुठे ते रामकृष्ण परमहंस व कुठे हे डोमकावळे? ह्यांत कुठे तुलना आहे का? म्हणून अशी बरोबरी करायला जाऊ नये.

सांगायचा मुद्दा हा की म्हणूनच कोणीतरी मार्गदर्शन करणारा पाहिजे. साधा प्रवास करतानाही कोणीतरी मार्गदर्शक लागतो. नाहीतर वेळेत मुक्कामाला पोहोचता येणार नाही. मुंबईमध्ये सातरस्ता म्हणून ठिकाण आहे, जिथे सात रस्ते आहेत. बाहेरचा माणूसच काय, मुंबईतल्या माणसालाही तिथे कुठे जायचे हे पटकन कळणार नाही. एका बाजूने भलतीच वस्ती लागते, दुसऱ्या बाजूने भेंडीबाजार लागतो. अशा ठिकाणी मार्गदर्शक नसेल तर माणूस भरकटत जाईल, मात्र मार्गदर्शक असेल तर माणूस अचूक मुक्कामाला पोहोचतो. आता जिथे दिसणाऱ्या रस्त्यावर मार्गदर्शक नसल्यास ही अवस्था होत असेल तर अव्यक्ताच्या प्रांतात मार्गदर्शक किती गरजेचा आहे हे लोकांना कळायला हवे, मात्र ते उमगत नाही. गुरू कशाला पाहिजे असे म्हणतात.

मी एकाला विचारले, गुरू कशाला पाहिजे हे म्हणतोस, तू लहानाचा मोठा जो झालास ते गुरूशिवाय? उपजत ज्ञानी होतास का? शाळा, महाविद्यालयात गुरूशिवाय शिकलास? वडिलांनी मार्गदर्शन केले असेलच ना? पावलोपावली गुरूंची गरज लागतेच. सांगायचा मुद्दा, सद्गुरूवाचोनी सापडेना सोय, धरावे ते पाय आधी आधी सद्गुरू हाच खरा देव, कारण ते खरा देव दाखवतात, ते ज्ञान देतात आणि मार्गदर्शन करतात.


# मेंदूच्या स्वास्थ्यासाठी..

आजकाल मेंदूचे आजार किंवा अस्वस्थता दिवसेंदिवस वाढत असल्याचे मला जाणवत आहे. तुमचा मेंदू दिवसातील २४ तास, आठवडय़ातील सात दिवस आणि वर्षातील ३६५ दिवस अविरत कार्य करीत असतो. त्यामुळे तो स्वस्थ राहणे फार गरजेचे आहे. त्याचे हे स्वास्थ्य पाच गोष्टींवर निर्भर आहे.

सामाजिक बांधिलकी

अन्न, पाणी, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा मानवाच्या आहेत, पण ?त्याचप्रमाणे मेंदूची अधोगती रोखण्यासाठी सामाजिक बांधिलकी महत्त्वाची आहे. सामाजिक बांधिलकीला धोका निर्माण झाल्यावर किंवा त्याला धक्का लागल्याने होणारे परिस्थितीतील बदल तसेच सामाजिक अनुभव याच्या आधारे तुमची मानसिक जडणघडण होत असते. ग्लोबल कौन्सिल ऑन ब्रेन हेल्थच्या अहवालानुसार मित्रपरिवार, कुटुंब आणि सामाजिक कार्यामधील सहभाग यामुळे आपला मेंदू निरोगी राहतो. याचसाठी क्लब, क्लास किंवा सामाजिक संस्था/ संघटनांशी जोडले जाणे गरजेचे आहे, जेणेकरून नव्या ओळखी होऊ शकतील. आपल्याला आनंदी ठेवणारे नातेसंबंध तसेच कार्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. तुमचे नातेसंबंध तुटले असतील, तर त्याच व्यक्तीशी किंवा नव्या व्यक्तीशी ते नव्याने तयार करण्यासाठी प्रयत्न करा. सामाजिक नेटवर्क जर मजबूत असेल, तर सहकार्याचे हात जास्त मिळतात, तणाव कमी होतो, नैराश्यावर मात करता येते आणि बौद्धिक उत्तेजना वाढते. जो समाज जीवनात जेवढा व्यस्त असतो, त्याची बौद्धिक हानी कमी होते, असे पाहणीत आढळले आहे. जे लोक मनापासून सतत क्रियाशील असतात आणि इतरांशी संवाद साधून असतात, त्यांचे आयुष्य आनंदी आणि स्वास्थ्यपूर्ण असते.

**शारीरिक व्यायाम :** शारीरिक व्यायामामुळे तुमचे आयुर्मान वाढते, तुमचा



चांगला मूड राहतो, तुमची झोप व्यवस्थित होते आणि वजनही घटवते, हृदयविकाराचा धोका कमी करते तसेच तुमची हाडे आणि मेंदू निरोगी ठेवते. तुमचा मेंदू हा शरीरातील स्नायूंप्रमाणेच असतो, एकतर त्याचा वापर करा किंवा तो गमवा. धावणे, जॉगिंग, पोहणे किंवा सायकलिंग हे नियमित केल्यावर नव्या मेंदू पेशींची वाढ होण्यास चालना मिळते तसेच अस्तित्वात असलेल्या पेशी सुरक्षित राहतात. दिवसातून किमान २० मिनिटे व्यायाम केला, तर बुद्धी तल्लख होण्यास मदत होते.

**पौष्टिक अन्न :** पौष्टिक आणि संतुलित आहार मेंदूला चालना देतो. धान्य, हिरव्या भाज्या आणि पालेभाज्या, ऑलिव्ह, मासे आणि ड्रायफ्रूट्स यांचा आहारात समावेश केल्यास, मेंदू निरोगी राहतो आणि अल्झायमरसारख्या आजाराचा धोकाही कमी होतो. ताजे अन्न शिजवा आणि खा, चविष्ट अन्नावर भर द्या, तसेच मित्रपरिवार आणि कुटुंबाबरोबर जेवणाचा आनंद घ्या. मेंदूसाठी योग्य अशा अमेगा-३साठी मासे खाणे खूप फायदेशीर आहे. मासे खात नसाल, तर अक्रोड तसेच अळशी, अंबाडी, जवस किंवा सोयाबिन्सचा वापर करता येईल. पालक, ब्रोकोली यांसारख्या हिरव्या पालेभाज्या यांच्याबरोबरच फळांचा आहारात समावेश करावा. ब्लूबेरी, रास्पबेरी, ब्लॅकबेरी तसेच डार्क चॉकलेट आणि हळद, दालचिनी आणि आले यांसारखे मसाले तसेच औषधी वनस्पती यांच्यात चांगल्या प्रमाणात अँटिऑक्सिडन्ट्स असते. ज्यामुळे मेंदूला चांगल्या प्रकारे रक्तपुरवठा होतो. अक्रोड हे हृदयाच्या स्वास्थ्यासाठी जेवढे उपयुक्त आहे, तेवढेच मेंदूसाठीही महत्त्वाचे आहे. याच्यामुळे आकलनशक्ती वाढते, तर धान्य स्मृती चांगली ठेवण्यास मदत करतात.

**निद्रा आणि आराम**

आपण झोपतो तेव्हा देखील मेंदूचे कार्य सुरूच असते. पुरेशा झोपेमुळे तुम्ही निरोगी आणि तंदुरुस्त राहता. प्रौढांना रोज रात्री ७ ते ९ तासांची झोप गरजेची आहे. झोपेमुळे तुम्हाला तजेलदारपणा मिळतो. तुमचा मूड चांगला राहतो आणि तुमची रोगप्रतिकार प्रणाली मजबूत बनते. झोपण्यापूर्वी तुम्ही रिलॅक्स व्हा. काही जण पुस्तक वाचतात, काही संगीत ऐकतात, तर काही जण गरम पाण्याने आंघोळ करतात.

**मेंदूची क्षमता वाढवा**

आपल्या मेंदूची खास क्षमता असते. ज्याद्वारे आपला मेंदू काही बदलांनुसार अनुरूप होऊन त्याचा स्वीकार करतो आणि नुकसान टाळतो. जी लोकं कायम शिकत असतात, नवनवीन कृती करत असतात आणि नवनवीन कौशल्य किंवा छंद जोपासत असतात, ते एकप्रकारे मेंदूची खास क्षमता वृद्धिंगत करीत असतात. नवे छंद जोपासा, नवी भाषा शिका, नवे संगीत, वाद्य शिका किंवा फोटोग्राफीमध्ये आनंद घ्या. याद्वारे मेंदूची क्षमता वाढण्यास मदत होते. कला ही तुमच्या मेंदूला पोषक असून, तुमचे मानसिक स्वास्थ्य राखते. खेळा, शब्दकोडे सोडवा, बुद्धिबळ किंवा स्मृती वाढविणारे खेळ खेळा. अशा कृती मेंदूला उत्तेजना देतात.

# चंद्रशेखर बावनकुळेंच्या मुलाने सहा गाड्या उडवल्या, दोघांची प्रकृती गंभीर; संजय राऊतांचा गंभीर आरोप

**मुंबई (प्रतिनिधी):** भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत बावनकुळे याच्या भरधाव ऑडीने नागपूरच्या रामदासपेठेत एकामागून एक दुचाकीसह चार ते पाच वाहनांना धडक दिली. अपघातावेळी संकेत बावनकुळे कारमध्ये नव्हता, माहिती मिळत आहे. आता या प्रकरणावरून राजकीय आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहेत. चंद्रशेखर बावनकुळेंच्या मुलाने सहा गाड्या उडवल्या. यातील दोन जखमींची प्रकृती गंभीर आहे, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत (डरपक्षरू ठर्रीं) यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, तो कोणत्या पार्टीचा आहे याच्याशी आम्हाला घेणे देणे नाही. चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा असो किंवा कुठल्याही नेत्याचा असो या राज्यात दोन कायदे आहेत का? महाराष्ट्रात हिट अँड रनच्या केसेस दिवसेंदिवस वाढत आहेत. हे मोठ्या बापाचे मुलं नशेत धुंद होऊन कोणालाही रस्त्यात उडवतात. या मोठ्या बापाच्या मुलांचे एफआयआरमध्ये नावही येत नाही. या राज्यात जर कायदा एक आहे तर फडणवीस गृहमंत्री आहेत त्यांनी नागपूरमधील हिट अँड रन केस बाबत बोलायला हवे.

नागपूरमधील अपघाताची गाडी कोणाची होती? ती गाडी कोणाच्या नावावर होती? गाडी कोण चालवत होतं? त्यानंतर चालकाची अदलाबदली करण्यात आली हे रेकॉर्डवर आहे. आरटीओ ऑफिसरने काय केले? नंबरप्लेट का बदलण्यात आली. जर बावनकुळे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा या अपघाताशी संबंध नाही तर ही चोरीचपाटी का करण्यात



आली? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. ते पुढे म्हणाले की, जर कोणी दुसऱ्या पक्षाचा नेता असता तर फडणवीसांच्या फौजा आमच्यावर तुटून पडल्या असत्या. मात्र आज तुमच्या प्रदेशाध्यक्षांचा मुलगा आहे. तो नशेत धुंद होता. दोन लोक गंभीर जखमी झालेत आणि एफआयआरमध्ये मुलाचे नाव देखील नाही. सर्व पुरावे मिटवण्यात आले आहेत हे अधिकार तुम्हाला आहेत का? देवेंद्र फडणवीस तुम्ही या पदावर बसण्याच्या लायक नाही. जोपर्यंत देवेंद्र फडणवीस या राज्याचे मुख्यमंत्री आहेत तोपर्यंत कुठल्याही प्रकरणाचा निष्पक्ष तपास होणार नाही. कायदा फडणवीसांच्या कोठीवर नाचत आहे, अशी टीका संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे. गाडीने सहा गाड्यांना ठोकर मारली. चार लोक जखमी आहेत. दोन लोक अत्यंत गंभीर स्वरूपात जखमी आहेत. ते जीवन मधमाशी झुंज देत आहेत. लाहोरी बार मधून नशेत धुंद होऊन हे लोक गाडीत बसले आणि गाडी चालवत गेले. गाड्या ठोकल्या, सीसीटीव्ही फुटेज गायब करण्यात आले आहेत. त्यानंतर गाडीची नंबर प्लेट काढून करून टाकली. युवराज स्वतः गाडी चालवत होते. पण, अपघात झाल्यावर ड्रायव्हरला बसवले, असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

# पाण्यात विजेचा प्रवाह उतरल्याने चार म्हशींचा दुर्दैवी मृत्यू

**अहमदनगर (प्रतिनिधी)::** नदीपात्रामध्ये असलेल्या समर्थ बंधार्यात पाणी पिण्यासाठी गेलेल्या चार म्हशींचा पाण्यात विजेचा प्रवाह उतरल्याने दुर्दैवी मृत्यू होण्याची घटना घडली आहे. यावेळी शेतकऱ्याने प्रसंगावधान राखल्यामुळे इतर १५ ते २० म्हशींचे प्राण वाचले असून स्वतः शेतकऱ्याचादेखील जीव वाचला आहे.

याबाबत घडलेली घटना अशी की शेतकरी सोपान बरबडे हे नेहमीप्रमाणे आपल्या म्हशी चारण्यासाठी या परिसरामध्ये घेवून आले होते. यानंतर म्हशी तहान लागल्याने कर्जत शहरातील लेंडी नदीवर समर्थ बंधारा आहे त्या बंधार्यामध्ये पाणी पिण्यासाठी आल्या. नेहमीप्रमाणे या सर्व म्हशी पाण्यामध्ये जात असताना सर्वप्रथम चार मशीन पाण्यामध्ये गेल्या. त्यामध्ये विजेचा प्रवाह आलेला होता आणि अवघ्या काही सेकंदात या चारही म्हशी विजेचा धक्का बसल्यामुळे तडफडून पाण्यात कोसळल्या. पाणी पाजण्यासाठी आलेल्या शेतकऱ्याच्या हे लक्षात आले. त्यांनी तात्काळ प्रसंगावधान राखत पाठीमागून पाण्याजवळ धावत येत इतर सर्व म्हशींना पाण्यामध्ये प्रवेश करू न देता पाठीमागे ढकलले. यामुळे इतर पंधरा ते वीस म्हशींचे प्राण वाचले. यावेळी पाण्यापासून स्वतःला लांब ठेवल्यामुळे या शेतकऱ्याचा देखील जीव वाचला. त्या शेतकऱ्याने तात्काळ महावितरण कंपनीच्या कर्जत कार्यालयाला फोन करून माहिती कळवली. यानंतर त्यांनी तात्काळ या परिसरातील विजेचा प्रवाह बंद केला. दरम्यान यानंतर महावितरणचे अधिकारी घटनास्थळी घेऊन त्यांनी पंचनामा केला आहे . या परिसरातून जाणारी वीज वाहक तार तुटून ती पाण्यामध्ये पडली होती व त्याचा प्रवाह पाण्यामध्ये उतरला असल्याचे दिसून आले. तर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी देखील शविच्छेदन केले आहे. शेतकरी सोपान बरबडे यांनी कर्ज काढून या सर्व म्हशी खरेदी केल्या असून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. या घटनेनंतर परिसरामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत असून पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली होती.

# सती देवी सामत दादा वडांगळी देवस्थानचा होणार सर्वांगिण विकास

## तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत पाच कोटींचा निधी मंजूर; पर्यटनदृष्ट्याही प्राधान्य देणार

**बीड (प्रतिनिधी):–** बंजारा समाजाचे आराध्य दैवत सतिमाता सामतदादा देवस्थानला अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गतचा पाच कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून वडांगळी देवस्थानचा सर्वांगिण विकास होणार असून देवनदी परिसराचे सुशोभीकरण होवून परिसर पर्यटनदृष्ट्या विकसीत होणार असल्याचे मत देवस्थानचे अध्यक्ष डॉ.नागेश चव्हाण यांनी म्हटले आहे.

नाशिक जिल्ह्यात सिन्नत तालुक्यात असलेल्या वडांगळी येथील सतीमाता सामतदादा हे देवस्थान बंजारा समाजाचे आराध्य दैवत असल्याने याठिकाणी मराठवाडा, विदर्भ, खानदेशसह शेजारील राज्यांतूनही बंजारा भाविकांचा दर्शनासाठभ मोठा ओघ असू असतो. मागील काही महिन्यांपुर्वीच या देवस्थानला राज्य शासनाने 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रात समाविष्ट केले आहे. यामुळे येथील देवस्थांनच्या विकासासाठी शासनाकडून ५ कोटी निधी देण्यात आला आहे. यानिधीतून देवस्थानच्या कामाचे अनेक विकास होणार आहेत. यामिळालेल्या निधीमुळे देवस्थानचे अध्यक्ष डॉ.नागेश चव्हाण, गावचे सरपंच नानासाहेब खुळे, तंटामुक्त गावसमितीचे अध्यक्ष सुरेश खुळे, उपसरपंच योगिता भावसार, माजी सरपंच योगेश घोटेकर, राहुल खुळे, माजी उपसरपंच गायत्री खुळे, ग्रा.प. अनिता क्षत्रिय, अशोक चव्हाण, रमेश खुळे, रतन चव्हाण यांच्यासह आदी देवस्थानच्या विश्वस्थानकडून स्थानिक आमदार, खासदार, तसेच जिल्हा प्रशासन आणि शासनाचे आभार व्यक्त केले आहे.





### देवस्थांनच्या सर्वांगिण विकासाठी नेहमी काम करणार –अध्यक्ष डॉ.नागेश चव्हाण

**बंजारा समाजाचे आराध्य दैवत असलेल्या सतीदेवी सामत दादा देवस्थानला शासनाकडून ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देवून ५ कोटी विकास कामांची मंजूरी दिली आहे. या निधीतून देवस्थानच्या सर्वांगिण [illegible]कास करण्यासाठी का[illegible]म कटीबद्ध राहून काम करणार असल्याचे [illegible]चे अध्यक्ष [illegible].नागेश [illegible] व्यक्त केले [illegible]**

# गणेशोत्सवा निमित्त चौंडेश्वरी मंडळाच्या रक्तदान शिबिरात ७९ दात्यांचे रक्तदान



**भुम (प्रतिनिधी):–** भूम शहरासह तालुक्यात यावर्षी गणेश बप्पा समाधानकारक वातावरण घेऊन आले आहेत . त्या अनुषंगाने प्रत्येक गणेश मंडळांनी तेवढ्याच उत्साही वातावरणात गणेश बपांची स्थापना करून आराधना सुरू केली आहे. शहरातील श्री चौंडेश्वरी तरुण गणेश मंडळाने ७९ व्या वर्षात रक्तदान व नेत्र शिबिरा बरोबर सामाजिक, धार्मिक कार्यक्रमानी उत्सवाला सुरुवात केली आहे.

रविवार दि. ७ सप्टेंबर २०२४ रोजी गणपती बप्पांचे आगमन झाले, गणपती बप्पांच्या आगमना बरोबर वरूनराजा ही बरसला , यावर्षी वातावरण समाधानकारक पाऊस पडल्यामुळे समाधानी दिसून आले , अशा स्थितीत गणपती बप्पांना सन्मानाने घरी घेऊन जाण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते चौका चौकात शहराच्या प्रमुख मार्गाने गणपती बप्पांचा जयजयकार करताना दिसून आले . बच्चे कंपनीचे मंडळ देखील तेवढेच आनंदी दिसत होते. भूम तालुक्यातील सर्वाधिक जुने आणि मानाचा गणपती बप्पा म्हणजेच श्री चौंडेश्वरी तरुण गणेश मंडळ, या मंडळाचे यावर्षी ७९ वर्षे आहे, या निमित्ताने मंडळाच्या वतीने गणपती बप्पांच्या आगमनानंतर रक्तदान शिबिर, नेत्रदान शिबिर घेतल आहे, याशिवाय सामाजिक, धार्मिक, ऐतिहासिक कार्यक्रम म्हणून संत ज्ञानेश्वर समाधी सोहळा हा देखावा आयोजित केला आहे, याशिवाय वृक्षारोपण आणि मिरवणुकी दरम्यान समाज प्रबोधन पर कार्यक्रम आयोजित केले आहे. आयोजित रक्तदान शिबिरामध्ये ७९ रक्तदात्यांनी रक्तदान केले, यामध्ये महिलांचाही तेवढाच सहभाग रक्तदान करण्यासाठी सहभाग दिसून आला. ५५ नागरिकांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. गणेश उत्सवा दरम्यान आयोजित रक्तदान व नेत्र तपासणी शिबिरावेळी अध्यक्ष वैभव उपरे, उमेश ढगे, विठ्ठल बागडे, शाम वारे, पत्रकार शंकर खामकर, माजी नगरसेवक सागर टकले , नवनाथ रोकडे, गंगाराम भागवत, सुहास खारगे, योगेश आसलकर, सुरज फलके, सोमेश म्हेत्रे, अतुल उपरे, शाम बागडे, ऋषिकेश कोकणे, प्रथम आसलकर, रोहित पाकले, राहुल होगाडे, दत्तात्रय भुजबळ, सागर बागडेसह अनेकजण कार्यरत होते.

# भगवंत सुखाचा सागर आहे, आनंदी व तणावमुक्त जीवन जगा– मोहन महाराज खरमाटे

**बीड (प्रतिनिधी):–** आपल्या जीवनात ताण, तणाव दूर ठेवून आनंदी जीवन जगा भगवान पांडुरंग परमात्मा हा आनंद व सुखाचा सागर आहे.हेच सुख आपल्या जीवनात उतरून आनंदी जीवन जगा असा अनमोल संदेश ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे यांनी काल कवडगाव येथील श्री संत बापूराव दादा साळुंके यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त कीर्तन सेवेमध्ये दिला

श्री संत वैकुंठवासी बापूराव दादा साळुंके यांच्या २१ व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त महाराजांनी निरूपणासाठी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा

**श्रश्रभव सिंधूचे काय कोडे/दावी वाट चाले पुढे//१//तारु भला पांडुरंग/पाव भीजो नदी अंग//२//** हा अभंग घेतला होता या अभंगावर सुंदर असे निरूपण करताना महाराज म्हणाले की, मानवी जीवन जगताना सर्व कोडे च आहे, हा संसार सर्वात मोठं कोड आहे परंतु ईश्वर भक्ती केली की हे कोडे प्रत्यक्ष भगवंत येऊन सोडवतो तो प्रत्यक्ष आपल्या मदतीला धावून येतो तो सुखाचा सागर आहे, आनंदाचा डोह आहे, त्यामध्ये आपण रममान होऊन जीवन व्यतीत करा अशा पद्धतीने जीवन जगा की आपल्या नंतर ही आपली कीर्ती या जगात राहिली पाहिजे. तेच खरे जीवन असा अनमोल संदेश महाराजांनी दिला .किर्तन सेवेमध्ये अभंग सोडवतांनी महाराजांनी रामायणातील सुंदर असा प्रसंग सांगितला तो असा नाथ बाबांनी रामायण



सांगतांना रावणाच्या अशोक वाटीके मधील फुले पांढरी होती असे सांगीतले. हनुमंताने नाथबाबांना सांगितले नाही तेथील फुले लाल रंगाची होती तर सीतामाई यांनी सांगितले की लंके मधील फुलं पांढरी ही नव्हती आणि लाल ही नाही, ती निळ्या रंगाची होती. या मोठ्या कोड्याचे उत्तर भगवान प्रभू रामचंद्रांनी प्रत्यक्ष रामायण करते नाथ महाराज यांना सांगितले ज्याचा जसा भाव आणि दृष्टी आहे त्याला त्याप्रमाणे फुले दिसली. रामायणातील हा प्रसंग ऐकताना सर्व श्रोते मंडळी व भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले होते .आपल्या पूर्वजांचे रूण फेडा एकत्र कुटुंब पद्धतीत रहा तसेच घरातील वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ करा त्यांच्यावर मुलाप्रमाणे प्रेम करा त्यांची हेळसांड होऊ देऊ नका त्यांच्या दवाखाना व खाण्यापिण्यावर लक्ष द्या असा बहुमोल संदेश महाराजांनी आपल्या कीर्तनामध्ये दिला.या पुण्यतिथी उत्सवा मध्ये कीर्तनाला गायनाची साथ संगत ह.भ.प.रामेश्वर महाराज जाधव, ह.भ.प. कागणे,महाराज, ह.भ. प.पांडुरंग उंडाळकर ,महादेव पोळ यांची होती.मृदंग- घनवट महाराज तर या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित ह.भ.प.हरिदास महाराज सोळके, ह.भ.प. बबन देवा जोशी, ह.भ.प. धुराजी कोळेकर शिरसमार्ग ,विणेकरी वाल्मीक चाटे हे होते . शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य रंगनाथ चादर, जितेंद्र साळुंके ,गोरख साळुंके, ज्ञानेश्वर माऊली साळुंके, गणेश विटेकर ,गेनबा साळुंके, तुळशीदास भाऊ साळुंके व किशोर करोडकर यांचे लाभले. दरवर्षी वै.श्री संत ह.भ.प. बापूराव दादा साळुंके यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त आदल्या दिवशी संगीत भजन व जागरणाचा कार्यक्रम आयोजित केला जातो यावर्षी बीडच्या सुमधुर गायिका शालिनीताई जाधव यांच्या सुरेल अभंगवाणी व गवळणी चा कार्यक्रम संपन्न झाला. यांच्याबरोबर सुरेखाताई जाधव ह्या होत्या तसेच त्रिशला उंडाळकर, तारामती घोटणकर ह भ प कवचट महाराज बोरदेवीकर ,मोरेवाडी भजनी मंडळातील सुप्रसिद्ध पेटीवादक राजेश काळे ,मृदंग विशारद ह.भ.प. चतुर्भुज महाराज घनवट, महादेव पोळ, बबन देवा,अनिल नांदूरकर ,सुधाकर आबा कराडकर ,विनोद आप्पा फुटाणे तसेच या संगीत भजनाला मोरेवाडी ,सुर्डी, कवडगाव ,नवीनगावठाण आधी गावची मंडळी उपस्थित होती.

# लाडकी बहीण योजनेचा अर्ज स्वीकारला, पण पैसे कधी येणार? सप्टेंबरमध्ये अर्ज भरल्यावर किती पैसे मिळणार?

**मुंबई (प्रतिनिधी):–** महिलांना दर महिन्याला थेट लाभ हस्तांतरणाद्वारे दीड हजार रुपये मिळावेत याकरता महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आणली आहे. या योनजेसाठी राज्यभराली कोट्यवधी महिलांनी अर्ज केले आहेत. तर, आतापर्यंत जवळपास दीड लाखांहून अधिक महिलांना या योजनेतील सन्मान निधीही मिळाला आहे. परंतु, अर्ज भरूनही काही महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. त्यांच्या खात्यात पैसे कधी जमा होणार? यासह तुमच्या मनातील सर्व प्रश्नांची उत्तेर आज जाणून घेउयात.

राज्याच्या पावसाळी अधिवेशनात लाडकी बहीण योजनेची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार १५ ऑगस्टपर्यंत महिलांना अर्ज भरायचे होते. परंतु, विविध तांत्रिक अडचणी आणि कागदपत्रांतील घोळामुळे ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली. परंतु, ३१ ऑगस्टपर्यंतही अनेक महिलांनी अर्ज भरले नसल्याने ही मुदत आता ३० सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे तुम्ही पात्र असाल तर आताही अर्ज भरू शकता. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महिलांना मिळावा, त्यांच्या सन्मान निधीचा वापर फक्त महिलांनी स्वतःकरता करावा याकरता या योजनेसाठी वैयक्तिक स्वतंत्र खात्याचा नियम करण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेसाठी जॉइंट अकाऊंटधारक महिला पात्र ठरणार नाहीत. त्यामुळे तुमचं स्वतंत्र खातं नसेल तर तुम्ही नजिकच्या कोणत्याही बँकेत जाऊन नवं खातं उघडू शकता. ऑगस्ट महिन्यात अर्ज भरलेल्या पात्र महिलांना जुलै, ऑगस्ट अशा दोन महिन्याचे पैसे मिळणार आहेत. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात अर्ज करणाऱ्या पात्र महिलांना तीन महिन्याचे पैसे मिळणार की एक महिन्याचेच मिळणार असा प्रश्न सातत्याने उपस्थित केला जातोय. मात्र, याबाबत सरकारने कोणतीही अधिकृत घोषणा केली नसल्याचं आदिती तटकरे यांच्या कार्यालयातून सांगण्यात आलं आहे. त्यामुळे सोशल मीडियावर फिरणाऱ्या कोणत्याही वृत्तावर महिलांनी विश्वास न ठेवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.



## पुढील आठ दिवसात नुकसानीचे सॅम्पल सर्व्हे करून

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा

## कृषी मंत्री धनंजय मुंडेंच्या पिक विमा कंपनीस कडक सुचना



बीड (सरकार): मागील काही दिवसात झालेल्या सततच्या पावसाच्या पाण्यामुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून तातडीने त्याचे सॅम्पल सर्व्हे विमा कंपनी व कृषी विभागाने संयुक्तरित्या ८ दिवसात पूर्ण करुन त्यापुढील १५ दिवसात शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा अग्रीम पिक विमा मिळावा, असे निर्देश कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात श्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. याबैठकीस आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, ॲड.राजेश्वर चव्हाण , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा कृषी अधिक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रक्लप संचालक सुभाष साळवे यांच्यासह विमा कंपनीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पिक विमा कंपण्यांचे प्रतिनिधींना पुढील आठवड्याभरात कृषी विभागाच्या सहकार्याने नमुना सर्वेक्षण करून त्याच्या पुढील १५ दिवसात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमाचा लाभ मिळाण्याबाबत सुचना केल्या. नमुना सर्वेक्षण करताना कुठलेही चुक अथवा दुर्लक्ष विमा कंपण्यांकडून झाली असल्यास अशा कर्मचाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल केले करावेत असेही निर्देश पालक मंत्री यांनी यावेळी दिले. बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झालेल्या सर्व महसूल मंडळातील नुकसानीच्या भरपाईचे नैसर्गिक आपत्ती अनुदान मागणीचे अहवाल राज्य शासनास तात्काळ सादर करावेत, असेही निर्देश श्री. मुंडे यांनी जिल्हा प्रशासनास दिले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण यां योजनेचा आढावा पालक मंत्री श्री मुंडे यांनी घेतला असून जिल्हयातील एकूण ६ लाख ४१ हजार १४७ महिलांचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. यापैकी ६ लाख १६ हजार ७८८ महिलांचे अर्ज मंजुर झालेले असल्याची माहिती जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी श्री. मुंडे यांना दिली. १२ हजार ६११ अर्जांवर मंजुरी देण्याची प्रक्रिया सुरू असून ११ हजार ७४८ अर्ज विविध कारणांनी प्रलंबित असल्याचे जिल्हाधिकारी यांनी पालक मंत्री यांना सांगितले, उर्वरीत अर्जांवरील समस्या लवकर दूर करून त्यांनाही मंजुरी देण्याचे निर्देश पालक मंत्री श्री. मुंडे यांनी यावेळी केल्या.

# रामगिरी महाराजाला अटक केले नाही तर आंदोलन-खुर्शीद आलम

## पोलिस अधीक्षक यांच्याकडे शिष्टमंडळाने केली मागणी



बीड (सरकार): गेल्या काही दिवसांपासून वादग्रस्त ठरलेल्या रामगिरी महाराज यांनी काहि ही कारण नसताना प्रेषित मुहम्मद पैगंबर(स.आ.स.)यांच्या विषयी अपशब्द वापरून मुस्लिम समाजाचे भावना दुखावल्या आहेत म्हणून बीडचे धार्मिक गुरु आणि सामाजिक लोकांनी मा.पोलीस अधिक्षक साहेबांची भेट घेऊन तक्रार दिली होती, बीड शहर पोलिस ठाण्यात रामगिरी महाराजवर गुन्हे दाखल करण्यात आले होते मात्र गुन्हे दाखल होऊन अनेक दिवस उलटले तरी सुद्धा वादग्रस्त महाराजला अटक केले गेले नाहीत म्हणून मुस्लिम समाजाच्यावतीने शिष्टमंडळाने खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्याशी चर्चा करून निवेदन दिले आहेत.

निवेदनात म्हटलें आहे की रामगिरी गुरू नारायण गिरी महाराज यांनी इस्लामीक धर्म गुरू प्रेषित मुहम्मद पैगंबर (स.आ.स.) यांच्या विरोधात विनाकारण अपशब्दांचे वापर करून सर्व मुस्लीम समाजांचे भावना दुखावल्या आहेत त्यामुळे मानसिक त्रास दिलेला आहे, त्यांच्या अपशब्दामुळे संपूर्ण देशात जातिय तणाव निर्माण झालेले आहे, या कारणांमुळे अनेक शहरांसह बीड शहर पोलिस स्टेशनमध्ये सुद्धा रामगिरी विरोधात कायदेशीर तक्रार नोंद होऊन गुन्हा दाखल झालेला आहे, पण आत्तापर्यंत वादग्रस्त महाराजला अटक केलेले नाही, किंवा त्यांचावर पुढची कारवाई झालेली नाही म्हणून समाजात रोष निर्माण होत आहेत, म्हणून रामगिरी महाराजला त्वरित अटक करण्यात यावी असे निवेदन लेखी स्वरूपात मा. पोलिस अधीक्षक साहेबांना देण्यात आले आहेत, अटक मध्ये दिरंगाई झाली तर मुस्लीम समाजाच्यावतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिष्टमंडळाने दिला आहे, यावेळी नगरसेवक सैय्यद इलियास,नगरसेवक मुन्नाभाई इनामदार, सुनील धायडे,शेख मोहसीन,अझर भाई,शेख सलाम,शेख जहीर,सय्यद फरहान,मोमीन शहबाज, अझर भाई,अखिल भाई,सलमान अली,नजीर भाई,अश्फाक भाई,आमेर पाशा यांच्यासह अनेक मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# माजी मंत्री बाबा सिद्दीकींची डॉ.योगेश क्षीरसागरांच्या संपर्क कार्यालयास भेट



बीड (सरकार): राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी हे बीड जिल्ह्याच्या दौर्यावर सोमवारी (दि.९) आले होते. त्यांनी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा डॉ.क्षीरसागर, अल्पसंख्याक सेल जिल्हाध्यक्ष इकबाल शेख यांच्यासह पदाधिकार्यांकडून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना बाबा सिद्दीकी म्हणाले, मुंबईत विमानतळावर माझी आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांची योगायोगाने भेट झाली. बीडमध्ये येत असल्याने त्यांनी माझे स्वागत केले. जिल्ह्यात माझे स्व.केशरकाकू, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. त्यानंतर डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्याशी माझे संबंध राहिले. स्व.गोपीनाथ मुंडे यांचे मला कायम सहकार्य लाभले. पालकमंत्री धनंजय मुंडे हे आज लोकसभा निवडणुकीतील पराभवावरून नाराज दिसून आले. मी देखील माझ्या पराभवानंतर नाराज झालो होतो. परंतु त्यांची नाराजी आता मतदारांनी दूर करावी. राजकारणात कुणी कोणाचा मित्र-शत्रू नसतो. मुस्लिमांचे मतदान घेणार्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे ९ खासदार वक्फ बोर्डाच्या मुद्द्यावर सभागृहात गप्प राहिले, हे आपला वापर करतात हे अल्पसंख्याक समाजाने लक्षात घ्यायला हवे, सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याचा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा विचार आहे. पक्षाच्या माध्यमातून जनहिताची कामे करू, असे सांगून डॉ.योगेश क्षीरसागर यांचे पक्षातील कार्य कौतुकास्पद आहे, त्यांना बीडकरांनी साथ द्यावी, असे आवाहन बाबा सिद्दीकी यांनी केले.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात स्वयंनिर्वाही अभ्यासक्रमास प्रवेश सुरू

बीड (सरकार): येथील नवगण शिक्षण संस्थेच्या सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजीनगर आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणार्या अभ्यासक्रमांना प्रवेश देणे सुरू आहे.

या अभ्यासक्रमातील प्रमाणपत्र कोर्स किमान दहावी पास झालेल्या विद्यार्थ्यांना कौशल्यानुसार स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी व नौकरीच्या विविध संधी मिळावी म्हणून त्यात दुग्ध व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सहा महिने), बालवाडी,अंगणवाडी प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सहा महिने),विक्री प्रतिनिधी प्रमाणपत्र अभ्यासक्रम (दोन महिने),सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सहा महिने), तर किमान बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी ग्रामीण पत्रकारिता (सहा महिने), ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र (तीन महिने) ,सर्टीफिकेट कोर्स इन कम्युनिकेटीव्ह इंग्रजी (सहा महिने) या अभ्यासक्रमाना प्रवेश देणे सुरू असून अनुक्रमे विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर सदरील विषयाच्या प्रवेशासाठी डॉ.अशोक डोंगरे (समन्वयक) मो.क्र. ९४२३७१६९४१ यांच्याशी संपर्क साधावा व प्रवेश घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी केले आहे. तर वरील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी यांच्याशी संपर्क साधावा.

# परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न प्राधान्याने सोडवणार-उपमुख्यमंत्री फडणवीस



बीड (सरकार): प्रकल्प ग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये योग्य जागा मिळाव्या यासाठी राज्याचे कृषी मंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केलल्या विनंतीला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री व ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी होकार दिला असून यापुढे मंजुर आकृतीबंधाच्या ५०% जागा प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये मिळणार, असल्याचे आजच्या बैठकीत निर्णय झाला.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात परळी वैजनाथ येथील थर्मल पावरच्या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबाबत दूरदृश्य प्रणाली माध्यमातून बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय घेण्यात आला. यावेळी परळीतील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न व मागण्या प्राधान्याने सोडवल्या जातील, असा शब्द उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिला आहे. मुंबईतील सह्याद्री शासकीय विश्रामगृहातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक तथा पर्यावरण व वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आमदार चंद्रशेखर बावनकुळे हे यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यासह प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी निळकंठ चाटे, श्रीकांत फड, राज गडदे, सुधीर फड, आत्माराम फड, मुजा भांगे, प्रविण मुंडे, प्रमोद नागरगोजे उपस्थित होते.

# आ.क्षीरसागरांनी स्वत: उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली

## कंत्राटदाराचे बिल आणि कर्मचाऱ्यांचे वेतन रखडल्याने थांबले होते काम



बीड (सरकार): बीड शहरात मागील काही दिवसांपासून स्वच्छतेचा आणि कचर्याचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावरून यामागील कारण शोधून त्यावर तोडगा काढला तसेच सोमवारी (दि.९) रोजी स्वतः रस्त्यावर उभे राहून शहरात स्वच्छता करवून घेतली. यावेळी, येत्या आठ दिवसांत शहरातील स्वच्छता मोहीम पूर्ववत होईल व येत्या दोन ते दिवसांपासून शहरांमध्ये घंटागाडी नियमितपणे कार्यरत होणार असल्याची माहिती आ.क्षीरसागर यांनी दिली.

सध्या गणेशोत्सव तसेच विविध सण-उत्सवांचा काळ आहे. परंतु यातच बीड शहरात गेल्या अनेक दिवसांपासून स्वच्छता होत नव्हती. तसेच कचरा उचलला जात नव्हता. त्यामुळे शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करत होता. यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी यामागील कारण जाणून घेतले. दरम्यान, नगरपरिषदेच्या माध्यमातून ज्या कंत्राटदाराला स्वच्छतेचे काम देण्यात आले होते. त्या कंत्राटदाराचे बिल मागील सात महिन्यांपासून थकले होते. परिणामी स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले होते. त्यामुळे बीड शहरात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर आ.क्षीरसागर यांनी शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निकाली लागावा यासाठी मा.जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून नगरपरिषद व कंत्राटदाराची संयुक्त बैठक घडवून आणत तोडगा काढला. आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकाराने बीड शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागला आहे. सोमवारी (दि.९) रोजी आ.क्षीरसागर यांनी स्वतः उभे राहून स्वच्छता करवून घेतली. तसेच पुढील आठ दिवसांमध्ये शहरात स्वच्छतेची मोहीम पूर्ववत झालेली असेल आणि येत्या दोन-तीन दिवसांपासून शहरात नियमित घंटागाडी कार्यरत होतील असे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.



**पाटोदा तालुक्यातील लवुळ वस्ती येथे आदर्श तरूण गणेश मित्र मंडळाच्या श्री.गणरायाची चैथ्या दिवसाची आरती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या हस्ते संपन्न झाली. याप्रसंगी शिवसेनेचे पाटोदा तालुकाप्रमुख मुकुंदजी शिंदे, युवासेनेचे उपाजिल्हाप्रमुख कृष्णा चौरे, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे,सोमनाथ लवुळ, विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील, अजय गायकवाड,जालिंदर लवुळ,ज्ञानेश्वर लवुळ, अभिजीत लवुळ,अजय लवुळ संदेश लवुळ,उमेश लवुळ ,दत्ता लवुळ सह सर्व उपस्थित होते.**

# शरद पवारांकडून पुजाताई मोरेंना आशीर्वाद



गेवराई (सरकार): गेवराई विधानसभा मतदारसंघात शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पुजाताई मोरे यांनी प्रमुख दावेदारी केली आहे. त्यांनी आतापर्यंत जवळपास दीडशे गावात आपला पहिल्या टप्प्याचा संवाद दौरा पूर्ण केला आहे. काल त्यांनी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत चर्चा केली.

यावेळी पवारांनी पुजा मोरे यांना आशीर्वाद देत लढण्यासाठी नवी ऊर्जा दिली आहे. या भेटीचा फोटो पुजाताई मोरे यांनी आपल्या फेसबूवर पोस्ट केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात प्रत्येकवेळी पवार-पंडित घराण्यात लढत होते. पण ही लढाई नेहमीच लुटूपुटूची असते. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर शरद पवार गटाला गेवराईत शेतकरी चळवळीत काम करणार्या पुजाताई मोरे यांनी साथ दिली. पवारांनी देखील पुजाताईंवर विश्वास टाकत त्यांच्यावर पक्षाच्या किसान सेलची राज्यस्तरीय जबाबदारी दिली. त्यामुळे तरुणांना संधी देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांना अल्पावधीतच ही ताकद दिल्याचे स्पष्ट झाले. लोकसभा निवडणुकीत पुजाताई मोरे यांनी खा. बजरंग सोनवणे यांच्यासाठी जीवतोड मेहनत घेतली.

## दक्षिणमुखी हनुमान टेकडी संस्थान येथील रामदेव बाबा जन्मोत्सव व जम्माजागरण सोहळा



बीड (सरकार): प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागाच्या जुना मोंढा रोड येथील संतोषी माता मंदिर सभागृहात रामदेवबाबा यांचा जन्मोत्सव भादवा सुदी बीज (२) गुरुवार रोजी भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी सकाळी रामदेव बाबा यांच्या मुर्तिस यजमान राधेश्याम कासट परिवारासह, मंदिर समिती, भाविकभक्तांच्या हस्ते महाभिषेक घालण्यात आला. तर रामदेव बाबा जन्मोत्सवानिमित्त सुशोभित करण्यात आलेल्या संतोषीमाता मंदिर सभागृहात दुपारी बाबाची महाआरती संपन्न झाली.

पेठ बीड भागातील प्राचीण आणि बीड जिल्ह्यातील सर्वात प्रथम प्राणप्रतिष्ठा झालेल्या दक्षिणमुखी हनुमान टेकडी, जुना मोंढा, बीड संस्थानात मागील पाच दशकापूर्वी रामदेव बाबा मूर्तीची स्थापना करण्यात आली. येथे अनेक भाविकभक्त मनोभावे रामदेव बाबांचे दैनंदिन दर्शनासाठी हजेरी लावतात. रामदेवबाबा यांचा जन्मोत्सव भादवा सुदी बीज (२) रोजी राजस्थानातील रामदेवरा येथे साजरा संपन्न होतो म्हणून येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात त्यांचा जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा होत असतो आणि दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना या पुरातन मंदिरातील रामदेव बाबांनी अनेक भक्तांना विविध प्रसंगातून दृष्टांत दिला असल्याची भावना भाविकात असून जे की त्यांच्या नवसाला रामदेव बाबाची कृपा झाल्याची अनेकांची भावना आहे.

## जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपसाठी अद्रिक अविनाश वडमारेची निवड



बीड (सरकार): बौद्धिक आणि सर्वांगीण विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. बीड मधील अबॅकस व वैदिक स्टडी केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस आणि वैदिक चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन अबॅकस पहिल्या लेवलपरीक्षांमध्ये सीनियर ग्रुपमध्ये अद्रिक अविनाश वडमारेला जागतिक अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली आहे.

बीडच्या अबॅकस सेंटर मध्ये २९ ऑगस्ट २०२४ रोजी निकाल जाहीर झाल्याप्रमाणे सर्वोत्कृष्ट सिल्वर मेडल मिळवून अद्रिक अविनाश वडमारेने सर्वोत्कृष्ट सिल्वर मेडलिस्ट रँकर चॅम्पियनशिपमध्ये सहभाग मिळवला आहे. जागतिक अबॅकस स्पर्धा डिसेंबर २०२४ मध्ये होत असून त्यामध्ये भारतासह पनामा, मोरोक्को, नेपाळ, श्रीलंका, युनायटेड किंग्डम, यु एस ए , सिंगापूर, झिंबाब्वे, दक्षिण आफ्रिका, देशांमधील दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. अद्रिक अविनाश वडमारेच्या यशामध्ये अबॅकस शिक्षकचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. अद्रिक अविनाश वडमारेला गणित विषयाबद्दलची मनात असणारी भीती दूर होऊन अनेक गणिते सहज आणि सोप्या पद्धतीने वेळेच्या आत मध्ये सोडवले जात आहेत असे त्याने सांगितले आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)